International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# ज्ञानेश्वरीतील आर्थिक व्यवहार विचार

**डॉ. अशोक लिंबेकर**

*मराठी विभागप्रमुख, संगमनेर महाविद्यालय संगमनेर*

*Corresponding Author –* *डॉ. अशोक लिंबेकर*

**DOI - 10.5281/zenodo.20487968**

**प्रास्ताविक:**

**गुरुवर्य डॉ अनिल** सहस्त्रबुद्धे यांनी गेली दोन वर्ष 'ज्ञानेश्वरी जयंती सप्तशताब्दी निमित अखंडित ज्ञानेश्वरी चिंतन अभ्यास वर्गाचे' आयोजन अहिल्यानगर येथे केले होते.या चिंतनाच्या निमित्ताने अनेक उपक्रम,व्याख्याने आयोजित केली गेली. तद्वतच काही वर्षापूर्वी या प्रकारेच ज्ञानेश्वरीचा अभ्यास करणारे 'वाङ्मयोपासक मंडळा'' ने एक प्रकल्प राबवून ज्ञानेश्वरी ग्रंथावर आधारित अनेक मान्यवरांच्या लेखनीतून साकारलेला **ज्ञानेश्वर दर्शन** हा ग्रंथ प्रकाशित केला होता.त्याच **मार्गाधारे वर्तणारे** पुढचे पाऊल म्हणजे ' हा द्विखंडात्मक बृहद ग्रंथ होय.

**तेराव्या शतकात** शके बाराशे बारा म्हणजेच इस.१२९० मध्ये संत ज्ञानदेवांनी **ज्ञानेश्वरी** म्हणजेच **भावार्थदीपिका** या ग्रंथाची रचना केली .हा कालखंड मध्ययुगीन कालखंड म्हणून ओळखला जातो.या काळात राजेशाही अस्तित्वात होती. आणि ज्ञानदेवांच्या काळात देवगिरीचे यादवराजे राज्यकारभार चालवत होते. म्हणूनच या काळाला' यादव कालखंड 'किंवा यादवकाल असेही इतिहासाच्या आणि कालखंडाच्या अभ्यासाच्या दृष्टीने म्हटले जाते. संत ज्ञानदेवांनीही त्यांचा गौरवाने उल्लेख केला आहे. यादवकाल हा परकीय सत्तेच्या संक्रमणाचा काळ . त्यानंतर महाराष्ट्रावर यवनी सत्तेचा शिरकाव होऊन पुढे सातशे वर्ष महाराष्ट्र या परकीय सत्तेच्या संघर्षात धुमसून निघाला .हा इतिहास तसा पाहिला तर शोषणाचा, अंधकाराचा आणि लढायांचा इतिहास म्हणून रक्तरंजित असा इतिहास आहे. यादवकाल ते शिवकाळापर्यंत या शोषणाचे चित्र तत्कालीन साहित्यातून उमटले आहे.संत ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर काही वर्षातच हे सत्तांतर घडले आहे. त्यामुळे या संघर्षाचे चित्र त्यांच्या साहित्यात उमटले नसले; तरी तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण त्यांच्या साहित्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरीचा आणि पर्यायाने संत साहित्याचा अभ्यास समाजिक परिप्रेक्षातून करण्यास आधुनिक काळात प्रारंभ झाला.न्यायमूर्ती रानडे,वि.ल भावे,ग.बा सरदार .वि.का राजवाडे यांची नावे या संदर्भात घेता येतात .**मार्गाधारे वर्तावे विश्व हे मोहरे लावावे, अलौकिक न होवावे लोकाप्रती'** अशी ज्ञानदेवांची धारणा असल्याने तत्वज्ञान, अध्यात्म, गीताबोध सांगत असतानाही त्यांनी लोकजीवनाचा आधार विविध अवघड गोष्टींचे सार सांगताना घेतला आहे.त्यामुळेच ज्ञानेश्वरीतील उपमा,दृष्टांत,दाखले देताना तत्कालीन समाजजीवनाचे संदर्भ आणि निर्देश आलेले आहेत.समाजिक,आर्थिक,कृषी,राजकीय,परिस्थिती,व्यापार, उद्योग याबाबतीतील आचार –विचार संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथातून अभिव्यक्त केले. याच पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरील आर्थिक व्यवहाराचा विचार इथे केला आहे. हा अभ्यास एक दृषिक्षेप आहे.हा समग्र अभ्यास अथवा विवेचन नाही हे प्रथमत: नमूद करतो.

तेरावे शतक हे मध्ययुगीन महाराष्ट्राच्या आर्थिक,सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे आणि संक्रमणाचे शतक होते.देवगिरीच्या यादव वंशाचे राजकीय वर्चस्व ,स्थिर शासनव्यवस्था ,आणि कृषिप्रधान अर्थव्यवस्था आणि त्यावर आधारित समाजरचना असे या काळातील समाजजीवनाचे चित्र होते.याचे प्रतिबिंब ज्ञानेश्वरी या ग्रंथात उमटलेले दिसते.महाराट्रातील भक्ती परंपरेचा आणि चळवळीचा उदयही याच काळात झाला.त्यामुळे या काळातील वारकरी आणि महानुभाव साहित्यातून तत्कालीन समाजदर्शन घडते.या अर्थाने हे पंथीय वाङ्मय महाराष्ट्राचा ऐतिहासिक दस्तऐवजच ठरतो. वारकरी परंपरेतील संत हे आठरापगड जातीतून आल्याने आणि ते समाजाच्या दैनंदिन जीवनाशी एकरूप ,समरस असल्याने तत्कालीन समाजिक आणि आर्थिक व्यवहाराचे चित्रण,वर्णन या काळातील संत साहित्यात आविष्कृत झाले.हे साहित्य लोकभाषेत आणि पद्य स्वरुपात ग्रंथित झाल्याने अनेक काव्यप्रतिमा ,प्रतीकांच्या माध्यमातून ते सहजपणे ध्यानी येते. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील या संदर्भातील दृष्टांत ,दाखले प्रतिमा ,प्रतीके यांचे विवेचन करण्यापूर्वी या काळातील समाजजीवन आणि आर्थिक जीवन ध्यानी घेणे गरजेचे आहे.

**यादवकालीन अर्थव्यवस्था आणि ज्ञानेश्वरीतील संदर्भ:**

तेराव्या शतकातील महाराष्ट्राची आर्थिक उभारणी मूख्यत्वे शेतीवर आधारित होती.तत्कालीन ग्रामव्यवस्था ही स्वयंपूर्ण होती. बलूतेदारी पद्धत अस्तित्वात होती.त्यामुळे सर्व कृषिविषयक कामे गावातच पूर्ण होत असत.त्यामुळे तत्कालीन समाजजीवन हे परस्परांवर अवलंबून होते.श्रम आणि श्रमाचा मोबदला असे देवाणघेवाणीचे सूत्र होते. शेतीच्या माध्यमातूनच कर ,महसूल गोळा केला जात असे.हे संकलन करणारी खास माणसे असत. कृषिकर,व्यापारकर,भूमिकर असे उत्पन्नाचे स्त्रोत होते. करदात्यांच्या स्थितीचे वर्णन म्हणूनच ज्ञानेश्वरीत प्रतिमात्मकतेने येते.' उदा. **जैसे प्रजाजनावरि भार ,तैसा राजा पावता थोर''** सुज्ञ राजा आणि त्याचा कारभार या संदर्भात हा दाखला महत्त्वाचा आहे.या काळात अंतर्गत व्यापारासाठी काही गावे, नगरे प्रसिद्ध होती.पैठण ,नेवासे,तेर ,यांचा उल्लेख यासंदर्भात करता येतो. नेवासे हे गाव तर व्यापारीमार्गावरील गाव म्हणूनही प्रसिद्ध होते. विदर्भ ,मराठवाडा या भागातील व्यापार याच मार्गावरून होत असे,पुढे नाणेघाटातील रांजण आजही त्याची साक्ष देतो. धान्य,धातू,वस्त्र ,मसाले,हातमागावरील वस्त्रे ,ती उत्पादने प्रसिद्ध होती.देवगिरी दौलताबाद हे या व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते. येथूनच आंतरराष्ट्रीयही व्यापार चाले. ज्ञानेश्वरीतील 'देता घेता' व्यापारी मनाचे तोल'' या निर्देशप्रतिमा तत्कालीन व्यापारसंबंधाचे निदर्शन करतात.तसेच कृषिप्रधान समाजजीवन असल्याने पाणी आणि पाण्याचे व्यवस्थापन ,सिंचन यासंदर्भातही विचार येथे प्रकटला आहे.'जीवन ते पाणिये ' या प्रतिमेतून हा विचार अधोरेखित होतो. जातीसबंधी व्यवसाय, उदा, सोनार, लोहार, कुंभार, इत्यादी जातींचा आणि त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचा उल्लेखही इथे येतो. दुग्धव्यवसाय, पशुपालन, कर्ज, रिण देणे - घेणे त्याची पद्धत, नफा-तोटा, यासबंधी विचार ज्ञानेश्वरीतून आला आहे. या काळातील सांस्कृतिक समृद्धीही विचारात घेण्यासारखी आहे. संगीतविषयक ग्रंथरचना, संगीत चूडामणी, संगीत रत्नाकर, संगीत सुधार; यासारख्या ग्रंथातून झाली आहे. इ.स.पूर्व २५० ते १००० या काळात कार्ले,भाजे,अजिंठा,वेरूळ येथील लेण्यांची निर्मिती झाली.यावरून हा काळ सांस्कृतिक समृद्धीचा काळ होता हे ध्यानी येते.तसेच याच

काळात यादवराजाचा [प्रधान हेमाद्रीपंडीत याने हेमाडपंती मंदिराची स्थापना आणि उभारणी केली आणि ही स्थापत्यशैली विकसित झाली.यावरून हा अत्यंत भरभराटीचा समृद्ध काळ म्हणून लक्षणीय ठरतो.

अर्थ म्हणजे लोकांचा योगक्षेम .त्यामुळे राजाने राज्य कसे करावे हे सांगणारे ते शास्त्र .राज्याचा राज्यकारभार ,करवसुलीवर चालतो.शेतकी ,पशुपालन व्यापार,यावर लोकांचा उदरनिर्वाह चालतो.त्यामुळे लोकांची सांपत्तिक स्थिती,उत्पन्न ,राहणीमान,आर्थिक व्यवहार,उदरनिर्वाहाची अन्य साधने,या सर्वांचा विचार अर्थशास्त्रात होतो. अर्थशास्त्र ही संकल्पना आधुनिक असली तरी यासबंधीचे विचार प्राचीन साहित्यात आणि संत साहित्यात अभिव्यक्त झालेले दिसतात .,नगरे,खेडी,शेती,बागायती ,त्यांची रचना ,घरे,रस्ते,याचा अंदाज या साहित्याच्या अभ्यासातून लावता येतो.राजा हा प्रजेचा पालन पोषण करणारा ,म्हणून त्याचा ईश्वरभाव ज्ञानदेवांनीही मान्य केला.ते म्हणतात ''

**पोषुनी अवयव आपुले,| करविजती मानविले |तेवी पालने लोभविले| जगजे भोगणे|**

या ईश्वरभावाप्रमाणे जरी राजाने प्रजेसाठी काही केले नाही ;तरी आपल्या जगण्यासाठी प्रत्येकाला काहीना काही तरी काम करावेच लागते.ही जगरहाटी आहे. त्यामुळे लोकव्यवहार हा कोणत्याही परिस्थितीत सुरूच असतो.तो थांबत नाही.यासाठी ज्ञानदेव म्हणतात '' **परि रावो पहुडलिया सुखे | जैसा देशीचा व्यापारू न ठके| प्रजा आपुलालेनी अभिलाखे | करितची असती''**| या उक्तीवरून राजा,प्रजा,त्यांचा उदरनिर्वाह ,दैनंदिन लोकव्यवहार ,जगण्यासाठी करावी लागणारी नित्यकर्मे यावर प्रकाश पडतो.यासबंधी व्यापार हा शब्दप्रयोग लोकव्यवहारासाठी ज्ञानदेवांनी योजला आहे. या व्यापारातून ,नित्यकर्मातुनच माणूस आपली उपजीविका भागवत असतो.उदरनिर्वाहानंतर जे शेष राहते त्यातून अधिकचे तो गोळा करत असतो.यालाच ज्ञानदेव संपत्ती असे म्हणतात .आज आधुनिक परिभाषेत ज्या विविध मार्गाने माणूस संपत्तीची निर्मिती करतो त्यालाच आपण धन-दौलत,स्थावर-जंगम मालमत्ता म्हणतो .या आर्थिक संपन्नतेची अत्यंत साधी व्याख्या ज्ञानदेवांनी केली आहे.संपत्ती संदर्भात ते म्हणतात '' **जेथ एक एकाते पोखी | ऐसे बहुत पदार्थ येकी | संपादिजती ते लोकी | संपत्ती म्हणजे** | एकमेकांस पूरक पोषक ,अशा अनेक पदार्थांचे संपादन म्हणजे संपत्ती.इथे पदार्थ वस्तू या अर्थाने लक्षात घ्यावे लागतात. कृषीवर आधारित एकातून दुसरे ,त्यावर आधारित अनेक वस्तू त्यांचा संचय,संपादन इथे सहज ध्यानात येते.धन,धान्य,पशू ,हीच त्याकाळात आर्थिक संपत्तीचे,सधनतेचे परिमाण होते.हेही इथे ध्यानात घेतले पाहिजे.

**श्रमाची विभागणी:**

चातुर्वण्य व्यवस्था आणि तिचा प्रभाव प्राचीन काळापासूनच प्रचलित आहे.जवळजवळ आधुनिक काळापर्यंत याच व्यवस्थेने भारतीय समाजजीवन प्रभावित झालेले दिसते. आज या व्यवस्थेतील जातीनुसार कर्म ही व्यवस्था लुप्त झाली असली ;तरी तेराव्या शतकात तीच व्यवस्था अग्रभागी होती.वर्णाश्रम धर्म कसोशीने पाळले जात होते.या व्यवस्थेने भारतीय समाज स्वयंपूर्ण होता .असे असले तरी अस्पृश्यतासारखे कलंकही याच व्यवस्थेने निर्माण केले होते .स्त्रिया आणि शुद्र यांना कसलाच अधिकार नव्हता.त्यांचा जन्मजात अधिकार नाकारला गेला होता ,तरीही स्त्री आणि शुद्र हेच श्रमात अग्रेसर होते.कृषीजन्य व्यवस्थेत स्त्रियांच्या श्रमाचा वाटा महत्त्वाचाच होता.

श्रम,उत्पादन,उपजीविका,या संदर्भात ज्ञानेश्वरीतील सातव्या अध्यायातील ३४९ व्या ओवीत पुढीलप्रमाणे वर्णन

आले आहे.'' **श्रम करिता कृषीवापरी | उपजीविका जगाची भारी** | ''शेतकरी शेती करून त्यावर आपला उदरनिर्वाह चालवत होते .त्याचप्रमाणे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू- अनेक कारागीर निर्माण करत होते. हाच कृषीनिष्ठ व्यवसाय करून ते आपली उपजीविका करत होते. म्हणूनच साधकाच्या अंत:करणपूर्वक साधनेच्या संदर्भात सांगताना ज्ञानेश्वर विणकराचा दाखला देतात.जसे की '' जेवी जाळी झाली करी | विणकर सुईने सुवारी | '' तसेच संचित धन आणि त्यानंतरचे फळ याबाबतीत त्यांनी बीज म्हणजेच बियाणे हे संचित गुंतवणूक आहे ,तर त्याचे फल म्हणजे उपज आहे. कॅपिटल आणि आउटपुट हाच विचार इथे अधोरेखित होतो.जसे की.'' जैसी बीजापासन उपजी | [ 13 ओवी १२४ ] तर संचयाचा दृष्टांत सोळाव्या अध्यायातील ३८२ क्रमांकाच्या ओवीत आला आहे. बाजारव्यवस्था त्यातील स्पर्धा ,एकच वस्तू असली तरी ग्राहक भाव पाहूनच खरेदी करतो.'जेवी विक्रयी एकवस्तू | घेती अनेके भावस्तू | बाजारातील चांगल्या वस्तूच ग्राहक निवडतो. तेही कोणतीही वस्तू तो निवडत नाही.जे त्याला परवडते तेच तो खरेदी करतो.तेच त्याला भावते.ही ग्राहकाची मानसिकता येथे प्रकट होते. व्यापारात व्यापाऱ्याला सदैव दक्ष राहावे लागते. दक्षता ,जोखीम समजूनच त्याला व्यवहार करावे लागतात ,साधकाचेही तसेच आहे.हे सांगताना ते म्हणतात '' सावधी न धरिता व्यापारी | विघवी व्यापारी दारी | इंद्रियाची शुद्धी तपासणाऱ्या साधकाला व्यापाऱ्याप्रमाणेच तोल-माप करावे लागते असे ते म्हणतात .सौद्याचा नफा ,तोटा पहावा लागतो.तसेच चांगल्या कर्माचा नफा आणि वाईट कर्माचा तोटा आहे. भोग हा क्षणिक सौदा तर परमार्थ हा दीर्घकाळ टिकणारा नफा आहे असा दृष्टांत ते देतात.भक्ती ही अखंड राहणारी,टिकणारी संपत्ती आहे. लोभ म्हणजे भंगार जमवणे होय. अज्ञान म्हणजे खोटे दागिने,देहाभिमान हा महातोटा,सत्य हे व्यवहारातील उत्तम नाणे आहे.नैतिकता ही धान्यासारखी जीवनाला पोषण देणारी गोष्ट असते. असे अनेक दाखले आणि आर्थिक प्रतिमा ज्ञानदेवांनी वापरल्या आहेत. श्रमावर आधारित तत्कालीन अर्थचक्र असल्याने श्रमिकांचा आणि श्रमाचा गौरव ते करतात .वर्ण्यव्यवस्थेत चार वर्गात श्रमाची विभागणी झालेली होती. **चातुर्वर्ण्य मया सृष्टी गुणकर्म विभागश :** यानुसार स्वभावधर्म आणि गुण याप्रमाणे ही कर्मे वाटून दिली गेली.आधुनिक परिभाषेत यालाच श्रमविभागणी Division of Labour असे म्हणता येईल.

**टाकसाळीची नाणी संदर्भ**:

दृश्य सृष्टी अथवा प्रकृती कशी निर्माण होते याचे वर्णन करतांना ज्ञानदेवांनी टाकसाळीचे रूपक योजिले आहे.यावरून त्या काळात टाकसाळीची नाणी निर्माण करण्याचे तंत्र उपलब्ध होते हे अनुमान आपण करू शकतो. या संदर्भात त्यांनी योजलेले रूपक मननीय आहे.

**ते सूक्ष्म प्रकृती कोडे | जै स्थुलाचिया आंगा घडे | तै भूतसृष्टीची पडे | टांकसाळ |**

**चतुर्विध ठसा | उमटू लागे आपैसा |मोला तरी सरिसा | परि थरचि आनान | 7 .23**

या टाकसाळीमध्येच चौऱ्यांशी योनीचे आकार तयार होतात.ते एकाच किमंतीची असली तरी त्याचे आकार भिन्न असतात. पंचमहाभूते, त्यातील विविध प्राणी, स्वेदज, अंडज, जारज, उदभिज या प्राणीरूप नाण्यांनी मायेचा गाभारा भरून जातो.

**होती चौऱ्यांशी लक्ष थरा | येरा मिती नेणिजे भांडारा|भरे आदिशून्याचा गाभारा | नाणेयांशी | [ 7.24]** सातव्या अध्यातच ज्ञानदेवांनी टाकसाळ आणि नाणे हे शब्दप्रयोग केले आहेत. तसेच 'कामठ 'हा शब्द

व्यापारासाठी योजला आहे. हे आर्थिक रूपक महत्त्वाचे आहे.

**कृषिनिष्ठ वैश्य आणि आर्थिक व्यवहार, व्यवसाय :**

वैश्य हा वर्ण व्यवसाय करणारा म्हणून सर्व परिचित आहे. विहित कर्मानुसार ते व्यापार उदीम करतात ,त्यावरच त्यांची उपजीविका अवलंबून असते.हा वर्ण म्हणूनच सर्व वर्णात आर्थिकदृष्ट्या समृद्ध असतो.या वर्णाशी निगडीत असलेले आर्थिक व्यवहार म्हणजे

**कृषी गोरक्ष्य वाणिज्य वैश्यकर्मस्वभावजम** शेती,पशुपालन ,व्यापारउदिम हे त्यांचे स्वभावजन्य व्यवसाय आहेत.यावर भाष्य करतांना ज्ञानदेव म्हणतात.

**तरी भूमीबीज नांगरू | यया भांडवलाचा आधारू | घेऊनि लाभु अपारु | मेळवणे जें | किंबहुना कृषी जिणे | गोधने राखोनि वर्तणे | का समघींची विकणे | महर्घी वस्तू |**

ज्याप्रमाणे शेतकरी शेती कसतो.धनधान्य निर्माण करतो; परंतु ते त्याला वैश्याकडेच विकावे लागते.कृषीजनापेक्षा या व्यापारात वैश्यालाच अधिक लाभ होतो याचेच हे मूर्तिमंत प्रतीक आहे. त्यामुळे तत्कालीन वैश्यांचा व्यवसायही कृषीनिष्ठच होता यावर इथे प्रकाश पडतो. आजही मधले आडते,व्यापारी हे शेतकऱ्यांकडूनच माल घेतात,ते साठवतात आणि त्यावर अनेक पटींनी लाभ मिळवतात ही वस्तुस्थिती आहे .आधुनिक काळातही यात फारसा बदल झालेला दिसत नाही. कृषीनिष्ठ भांडवलाचाच आधार घेऊन हे व्यवसाय करत असतात .नफा मिळवत असतात .स्वस्त घेऊन महाग विकत असतात .अधिकचा नफा मिळवण्यासाठी मग लबाडीही येते.याचेही उदाहरण ज्ञानदेव देतात .ते समकालातही कालसंवादी आणि प्रस्तुत ठरते. जसे की भेसळ करणे.ही भेसळ साध्या दुधात पाणी घालण्यापासून सुरु असते. हा एक प्रकारचा गैरव्यवहारच असतो. जसा सोनार म्हटले की तो काही अंशी सोने चोरणारच.त्यात ,काहीतरी राखून ठेवणारच असापरंपरेने चालत आलेला लोकसमज असतो.या समजाला पुष्टी देण्याचे आणि मी असे काही करत नाही ,तर रामनामे सोने चोरी **,असे नरहरी सोनाराने** म्हणून ठेवले आहे. असे त्यांना का म्हणावे वाटले याचा विचार केला पाहिजे. यासमच जो भ्रष्ट व्यवहार असतो त्याचा निर्देश ज्ञानदेव **''वाचूनि दुधा मेळवूनी पाणी ''** [ 13.८५२ ] असा करतात .उद्योग असो की व्यवसाय ,धनसंचय तो नीतीला धरूनच असला पाहिजे.'' **जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ''** असे तुकोबांचेही प्रतिपादन आहेच. तसेच **''जेणें चोखाळत दिसे न्याय | तो व्यवसायात व्यवसाय | माझेंची स्वरूप हे राय | सुरांचा म्हणे | [ 10.२८६]** व्यवसायातील नैतिकतेचे सूत्र इथे प्रतिपादिले आहे**. व्यवसायाचे व्यवस्थिती | दानयुक्त अति संपत्ती | ते लक्ष्मी मी म्हणे श्रीपती | जाण निश्चयी उद्धवा | [ 16.२३८]** सत्य मार्गाने मिळवलेली संपत्ती आणि तिचा धर्मनिष्ठ विनियोग झाला तरच ती संपत्ती दैवी असते.दैवी आणि असुरी संपत्तीची धारणा याच मुले लोकमानसात दृढ आहे.

**शेती -शेतकरी कर्जबाजारीपण:**

भारत हा देश कृषिप्रधान आहे.कृषिप्रधानता हे आपल्या संस्कृतीचेच एक विशेष ,त्यामुळे कृषीव्यवस्थेचा प्रभाव आपल्या समाजजीवनावर होणे स्वाभाविकच. कृषिजीवन हे नेहमीच निर्सगाच्या अनुकलतेवर, निसर्गाच्या लयीवर निर्भर असते.निसर्गाचा कोप, याला अस्मानी संकट असे प्राचीन साहित्यात आणि आपल्या लोकभाषेतही म्हटले आहे. हे अस्मानी संकट म्हणजेच महापूर, अतिवृष्टी, दुष्काळ, रोगराई इत्यादी. निसर्गाची प्रतिकुलता ही कृषीवलांच्या सामाजिक, आर्थिक जीवनातही प्रतिकूलता निर्माण करते. उदरनिर्वाहाचे साधनच शेती असल्याने

दुष्काळ –आणि अतिवृष्टी हे दोन्हीही निसर्गघटक कृषीव्यवस्थेवर परिणाम करणारे आणि प्रभाव टाकणारे घटक ठरतात. काळ कितीही बदलला तरी हे चक्र अविरतपणे सुरूच असते.निसर्गाच्या प्रकोपामुळे निर्माण झालेली शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक विदारतेचे भीषण चित्रण संतसाहित्यातून आले आहे. ज्ञानेश्वरीतही या अवस्थेचे चित्रण ज्ञानदेवांनी केले आहे. संत तुकारामांचा साधकावस्थेचा प्रवास असो की, संत एकनाथांनी केलेले अस्मानी –सुलतानी संकटाचे वर्णन. पशू–आणि शेती यावर दुष्काळ हा किती परिणाम करतो याचे चित्रण संतकाव्यातून आले.शेतीवर उपजीविका असलेल्यांचे जीवन,कृषिमाल खरेदी –विक्री ,या संदर्भात अनेक दाखले,दृष्टांत ज्ञानेश्वरीत येतात.पावसाच्या आभावी झालेली दैन्यावस्था ,म्हणजे केवळ उपासमारच नाही, तर शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा, सावकारी पाश, व्याजाने घेतलेले पैसे,सावकरांकडून होणारे शोषण, त्यातून येणारी हतबलता,अगतिकता,दारिद्र्य याचे वर्णन यासंदर्भात येते. शेतकऱ्यांसाठी कुळवाडी, असा शब्द येथे योजलेला दिसतो. शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले हे कर्जबाजारीपण आजचे नाही ;तर ते तेराव्या शतकातही ते होते.फरक एवढाच की, त्या काळात आत्महत्याचा संदर्भ येत नाही .तत्कालीन माणूस हा जीवट आणि चिवट वृत्तीचा आणि दैवावर भार सोपवून जगत असल्याने हे आपल्या प्रारब्धाने झाले ,अशी त्याची धारणा होती.त्यामुळेच हे संकट मानवी अस्तित्वाच्या सर्वनाशाचे कारण ठरले नाही. आधुनिक काळात मात्र विपरित परिस्थिती आहे. त्या काळातही शेतकऱ्यांना शेठ-सावकारांकडून, महाजनाकडून ऋण [ कर्ज ] घ्यावे लागत होते.धनको –आणि ऋणको हा वर्ग मध्यकालातही अस्तित्वात होता. या कर्जामुळे शेतकऱ्यांची अवस्था कशी होते याचा संदर्भ खालील ओवीत आला आहे.

**"कुळवाडी रिणे दाटली | कां वांकडिया ढोरे बैसली | तैसी नुठ्ली कांही केली | जीभचि हे |" [ 13.५६५]**

ज्याप्रमाणे अतिवृष्टीचा मारा सहन केलेली ढोरे अंग चोरून, काकडून, गारठून शांत बसलेली असतात,त्यांच्यात कुठलेच त्राण नसते, किंवा वार्धक्यात माणसाची जीभ जड होते, तशी अवस्था कर्जबाजारीपणाने, निसर्गाच्या अवकृपेने होते. दुष्काळामुळे कर्ज फेडणे दुरापास्त होत असल्याने पुन्हा शेतकऱ्यांना कर्जफेडीसाठी मुदत वाढवण्याची भिक मागावी लागे.यालाच "माले मागणे" असाही वाकप्रचार रूढ होता. शेती कर्ज आणि कर यात नाडल्या गेलेल्या कृषीजीवनाचे भीषण चित्र येथे आले आहे. .निसर्ग हा घटक अवघ्या विश्वाला प्रभावी करणारा असतो.म्हणूनच ज्ञानदेव म्हणतात "**जे अवृष्टीचेनी उपद्रवे | गादले विश्व आघवे | म्हणोनि पर्ज्यनेष्टी करावे| नानापरि" [ 13.२२१]**

सावकारी पाश आणि ही भीषण अवस्था ,कर वसूल करणारे अधिकारी,त्यांचा बडेजाव , रिण काढून सण साजरा केल्यासारखेच होते. जर अपेक्षित उत्पन्न आले नाही तर दंड केला जाई.शेतसारा, कर,द्यावा लागणारा वाटा ,याबाबतीत संदर्भ ज्ञानेश्वरीत येतात.मूख्य विषयाच्या प्रतिपादनासाठी हे वर्णन, दृष्टांतरूपात, अथवा रूपकात्मक येत असले तरी, समाजजीवनातील वास्तव दर्शन घडवणारे होते. ज्ञानदेवांच्या आजूबाजूला हे घडत होते, त्यांचे उत्कट संवेदनाक्षम मन याचे निरीक्षण करत होते.त्याचेच चित्र त्यांच्या लेखनात उमटले आहे. यासंदर्भात पुढील ओव्या महत्त्वाच्या आहेत.

**"पै बोळविजे रिणाइतु | तैसा झकवी तयाचा हातु| तू करणे याचा बहुतू | प्रयोगु तेथ |"**

**किंवा अधिकारिया रिगता गावो | होय जैसा उत्साहो | कां रिणावरी विवाहो | निस्तारिला" [ [18.७९५]**

शेतसारा, कर वसूल करण्यास आलेल्या अधिकाऱ्या उत्साहात स्वागत करणे, त्यांना खूष करण्यासाठी रिण काढणे [ कर्ज] काढून सण साजरा करण्यासारखेच होते. हा दाखला येथे येतो.शेती आणि शेतीशी सबंधित बलुतेदार, त्यांची वस्तूची निर्मिती याबाबतही माहिति ज्ञानेश्वरीत येते.बोहनी हा शब्दही विक्रीचा पहिला व्यवहार याबाबतीत आला आहे. तर विणकर, कुंभार, सुतार, लोहार, तेली, परिट त्यांचे बलुते, धान्याच्या उपयोग चलन म्हणून करणे, त्याबदल्यात वस्तू खरेदी करणे.हेही संदर्भ येथे येतात .

**तोट्याचा व्यवसाय –आतबट्ट्या व्यवहार:** जाणीवपूर्वक आणि नफ्याचा अंदाज घेऊन व्यवसाय केला नाही तर तो तोट्यात जातो.या बाबतीत नेहमीच व्यापाऱ्याला दक्ष राहावे लागते ,नाहीतर नुकसान हे ठरलेलेच असते.याबाबतही काही ओव्या ज्ञानेश्वरीत प्रतीकात्मतेने आल्या आहेत. व्यवसायात कुणीही हानी करून घेत नाही ;परंतु कधी -कधी तसे होते.म्हणूनच ज्ञानदेवांनी रोजच्या व्यवहारातील, लोकांना पटतील अशी उदाहरणे दिली आहेत. उदा. घर मोडून कुणी देव्हारे करत नाही किंवा दारातल्या मांडवासाठी कुणी घर मोडत नाही.पेरणीसाठी राखून ठेवलेले बीज कुणी खाण्यासाठी वापरत नाही ,अशी उदाहरणे यासंदर्भात येतात.

**“अहो वसती धवळारे| मोडूनि केले देऊळे देव्हारे | नागौनि वेव्हारे | गवादि घातली |” [ 13.२३०]**

**घर मोडोनि केले | मांडव पुढे [ 13.२३१] बैल विकूनि गोठा | पुसां लावोनि गांठा | [13.232]**

**बीजिची वरोसि वेचे | तै वाढती कुळवाडी खांचे | [ 18.२५८] किंवा**

**अभ्रछायेचिया जोडी | निदैवु घर मोडी | मृगांबु देखोनि फोडी | पाणियाडे मूर्ख | ‘’ [ 13.२५८]**

ढगांची सावली पाहून घर मोडणारा किंवा गोठा बांधण्यासाठी बैल विकणारा किंवा मृगजळ पाहून तळे फोडणारा हा अव्यवहारी असतो. व्यवसायात नेहमीच व्यवहारी आणि सद्सद्विवेक बुद्धीनेच विचार करावा लागतो याचेच हे प्रतिपादन आहे.

**तत्कालीन व्यवसाय :**

व्यवसायासबंधी विविध शब्द ज्ञानेश्वरीत आले आहेत. बारा बलुतेदार त्यात आहेतच ;परंतु त्याबरोबर मनोरंजनाचे खेळ करणारे ,वेश्याव्यवसाय करणाऱ्या गणिका, घोड्यांची निगा राखणारे मादुरी, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारे, याला साईखडे असा शब्द वापरला आहे. गुरे राखणारे गोवारी, कोल्हाटी, डोंबारी, द्यूतकर्म करणारे जुगारी, कोळी, दिवटा –रात्री मशाल घेऊन वाट दाखवणारा, सुआरू –आचारी, उदरनिर्वाहासाठी असे नानाविध व्यवसाय करणारे त्या काळात होते. याचे प्रत्यंतर ज्ञानेश्वरीत येते. तसेच, नगरे त्यांची रचना, गावखेडे, श्रीमंत माणसांची दुमजली, तिमजली चुनागच्चीची घरे, यास **‘त्रिमालिके धवळारे** ‘असे म्हटले आहे. लुगड्यांचे प्रकार ही सर्व समाजजीवनातील माहिति ज्ञानेश्वरीत आली आहे..अन्न, वस्त्र निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्कालीन समाजात कोणत्या प्रकारची कामे, व्यवसाय, व्यवहार केले जात होते याचे दर्शन इथे घडते.

धनसंचय, लोकांना फसवून केलेला संचय, अथवा अन्न विकणे या गोष्टी त्या काळात निषिद्धच होत्या.त्या काळात धान्याची विक्री केली जात होती; परंतु अन्नाची विक्री मात्र निषिद्ध मानली गेली. आधुनिक काळात आपण सर्वत्र हॉटेलिंग व्यवसाय, फास्टफुड्सची विक्री, जोमात चाललेली बघतो. आज पाण्याचीही मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. खाजगीकरण, उदारीकरण, वैश्विकीकरणाच्या या काळात अन्न –पाणी या बाबींनी मोठी बाजारपेठ व्यापली आहे. तेराव्या शतकात मात्र या स्वरूपाचा केलेला व्यवसाय निषिद्ध मानला जात होता उदा.

**जैसी रांधवणी रससोय निकी | करुनिया मोले विकी | तैसा भोगासाठी अविवेकी | धाडिती धर्मू | [ 2.२५४]** याबरोबरच कष्ट करून जमवलेली संपत्ती, केवळ देहासाठी खर्च करून फक्त देहाचीच जोपसना करावी का? किंवा धर्म विसरून अर्जित केलेली संपत्ती खर्च करावी का? असे प्रश्न ज्ञानदेवांनी विचारले आहेत. एकूणच नीतीमार्ग आणि स्वधर्माचरण आणि उत्तम व्यवहाराने जमवलेली संपत्तीच हीच दैवी संपत्ती असते, हे प्रतिपादन ज्ञानेश्वरीत आले आहे.

**समारोप :**

ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अनेकांना चिंतनास प्रवृत्त करणारा ग्रंथ आहे.किंबहुना तो एक ज्ञानसागरच आहे. ते कवळ गीतेवरील भाष्य नाही तर ; एक स्वतंत्र असा भाष्यग्रंथ आहे.गीतेतील तत्त्वज्ञान विस्ताराने आणि समोरच्या श्रोतृवर्गाना पटवून देण्यासाठी ज्ञानदेवांनी अनेक लौकिक जीवनातील दाखले दिले आहेत. त्यातून तत्कालीन समाजाचे चित्र दिसते. समाजजीवन, त्यातील रूढी, परंपरा याबरोबरच लोकांचे राहणीमान, खानपान-त्यांचा व्यवसाय या अनुरोधाने ज्या बाबी ज्ञानेश्वरीतून अभिव्यक्त झाल्या, त्यातील काही अंशी विवेचन येथे केले आहे. या विवेचनातून नक्कीच आपणास तत्कालीन समाजाचे आर्थिक जीवन,कृषीनिष्ठ कसे होते आणि हाच त्यांचा आर्थिक आधार होता हे सपष्ट होते. विविध व्यवसाय,त्यातील नीती-अनीती, उपदेश यांचे दर्शन इथे घडते. अर्थशास्त्र ही जरी आधुनिक संकल्पना असली, तरी आर्थिक व्यवहाराच्या, व्यवसायाच्या अनुषंगाने हा विचार आपण करू शकतो. या लेखनामागील हेतूही तोच आहे.